## निशाणी क्र.३५ कडील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने त्याच्या विरुध्द झालेला दुरुस्ती कैफियत नाही हा आदेश रद्द करून दुरुस्ती कैफियत करण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिवादीस दुरुस्ती कैफियत दाखल करुन आपले म्हणणे मांडणे आहे असे माहित नसल्याने तो त्याच्या वकीलांची भेट घेवू शकला नाही. कोविड-१९ च्या प्रार्दभावाने दुरुस्ती कैफियत दाखल करण्यासाठी विलंब झाला आहे. ना. सर्वोच्च न्यायालय यांनी सु-मोटो रिट पिटीशन क्र. ३/२०२० मधील आदेशाप्रमाणे दिनांक १५/०३/२०२० ते दिनांक २८/०२/२०२२ हा कालावधी मुदतीच्या गणणेतून वगळला आहे. या कारणास्तव त्यांनी प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे. वादीने आपले म्हणणे दाखल करुन दावा दुरुस्ती कैफियत दिनांक २१/०१/२०२० रोजी करण्यात आली असून दिनांक ०४/०३/२०२० रोजी प्रतिवादी यांनी दुरुस्ती दावा प्रत स्विकारली आहे. सबब कोविड-१९ काळाचा गैरफायदा घेवून प्रस्तूतचा अर्ज दाखल केला आहे. या कारणास्तव त्यांनी प्रस्तूतचा अर्ज फेटाळण्याची करण्याची मागणी केली. प्रतिवादी व वादी यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी यांच्याविरुध्द दिनांक ०९/१२/२०२१ रोजी विना दुरुस्ती कैफियत आदेश पारीत करण्यात आला होता. प्रतिवादीने प्रस्तूतचा अर्ज दिनांक ०८/०६/२०२२ रोजी दाखल केला आहे. याठिकाणी मी आदरपूर्वक नमूद करु इच्छितो की, ना. सर्वोच्च न्यायालय यांनी सु-मोटो रिट पिटीशन क्र. ३/२०२० मधील आदेशानुसार दिनांक २८/०२/२०२२

रोजी पर्यंत कालावधी मुदत गणणेतून वगळला असला तरी सदर कालावधी संपुष्टात आल्यानंतर प्रस्तूतचा अर्ज दाखल करण्यात आला आहे. असे असले तरी दाव्याचा निकाल गुण-अवगुणावर लागण्यासाठी प्रतिवादीची दुरुस्ती कैफियत अभिलेखावर येणे आवश्यक आहे या मतास मी पोहचलो आहे. करीता प्रतिवादीने वादीस ३००/- रुपये खर्चाच्या स्वरुपात देण्याच्या अटीवर मी खालील आदेश पारीत करतो-

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने वादीस ३००/- रुपये खर्चाच्या स्वरुपात देण्याच्या अटीवर त्याचे विरुध्द झालेला विना दुरुस्ती कैफियत आदेश रद्द करून दुरुस्ती कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

(सं. गं. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
मुरूड

दिनांक : ०६/०७/२०२२